नियमित फौजदारी खटला नं.१४६/२०२४
निशाणी- २४

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ चा जबाब.

मी शपथेवर कथन करतो की,
माझे नांवः- दिनेश विठ्ठलराव आहेर
वयः- ५३ वर्षे, पदः- पोलीस निरीक्षक
नेमणुक- नियंत्रण कक्ष, आहिल्यानगर

सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती सीमा शेख यांचेकडूनः-

१. एप्रिल २०२३ ते जुन २०२५ पर्यत मी स्थानिक गुन्हे शाखा अहमदनगर येथे कार्यरत होतो. दरम्यानच्या कालावधीत पोलीस निरीक्षक संजय सोनवणे नेमणुक सायबर पोलीस स्टेशन यांची बदली झाल्याने त्यांचा तात्पुरता कार्यभार दि. ०९/१२/२०२३ पासुन आमच्याकडे देण्यात आला होता. सदर कार्यभारामध्ये गु. र.नं.२५/२०२३ चा तपास माझ्याकडे सोपिविला होता. सदर गुन्हयाचे कागदपत्राचे मी अवलोकन केले. गुन्हयातील साक्षीदार निलकंठ कारखेले याचा जबाब मी नोंदविला होता. गुन्हयाचे प्राप्त कागदपत्रावरुन आरोपीने फिर्यादीचे संमतीशिवाय त्यांचे फेसबुक अकांऊट, इस्टाग्राम अकांऊट आणि मेल आय डी हे पासवर्ड बदलुन वापरल्याने तसेच आरोपी याने गुन्हा करतेवेळी वापरलेले मोबाईल व सिमकार्ड हे पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने फेकुन दिल्याने त्यांचे विरुध्द मी भा. द. वि. कलम २०१ व तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा, कलम ४३, ६६ (सी) प्रमाणे दोषारोपपत्र दाखल केले. आरोपीला पाहिले असता मी ओळखु शकतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

उलट तपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. टी . माने यांचेकडूनः-

२. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०९/१२/२०२३ रोजी सदर गुन्हयाचा तपास माझ्याकडे वर्ग करण्यात आल्याबाबत लेखी आदेश दोषारोपपत्रासोबत दाखल केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मला सदर गुन्हयाचा तपास करण्याबाबत औपचारिक आदेश देण्यात आला नसल्यामुळे तो मी दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.०९/१२/२०२३ पूर्वी झालेल्या तपासाची मला वैयक्तीक माहिती नाही. दि.२३/०९/२०२३ रोजी फिर्यादीने दिलेल्या अर्जाचे मी अवलोकन केले होते. निलकंठ कारखेले (अ.सा.क्र.२) यांनी त्याचे जबाबामध्ये 'आरोपीस नोटिस देऊन त्याचेकडुन गुन्हे करते वेळी वापरण्यात आलेला मोबाईल जप्त करण्यात आला ', असे मला सांगितले

नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, सदर साक्षीदाराच्या जबाबामध्ये आरोपीकडुन गुन्हा करतेवेळी वापरलेला मोबाईल जप्त करणेबाबत मजकुर आलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, दोषारोपपत्रासोबत जप्तीचा पंचनामा जोडलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी याने गुन्हा करतेवेळी वापरलेले मोबाईल व सिमकार्ड हे पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने फेकुन दिल्याचे मी खोटे कथन केले आहे.

३. फिर्यादीचे जन्म वर्षे १९९६ आहे का हे मला सांगता येणार नाही. दोषारोपपत्रामध्ये दाखल केलेल्या फिर्यादीचे आधारकार्ड प्रमाणे तिचे जन्म वर्षे १९९६ आहे. गुगल व मेटा यांचेकडुन आलेल्या उत्तरानुसार फिर्यादीचे जन्म वर्षे १९९५ आहे काय हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दोषारोपपत्राचे योग्य अवलोकन केले नसल्यामुळे मला फिर्यादीचे जन्म वर्षाबद्दल सांगता येणार नाही. साक्षीदारास गुगलकडुन दि. २६/०९/२०२३ रोजी प्राप्त झालेले उत्तर दाखविण्यात आले. त्यामध्ये जी खातेधारकाची माहिति आहे त्यामध्ये फिर्यादीचे जन्म वर्षे १९९५ मधील आहे. सदर दस्त उलटतपासामध्ये साक्षीदारास दाखविल्यामुळे त्यास नि. २५ देण्यात येत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर उत्तरामध्ये (नि.२५) १० ते ११ वेगवेगळे आय पी ॲड्रेस दिसत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर आय पी ॲड्रेस पैकी एकही ॲड्रेस आरोपीच्या मोबाईल नंबरशी अथवा लोकेशनशी संबंधीत असल्याचे कागदपत्र दोषारोपपत्रामध्ये दाखल नाहीत. मी निलकंठ कारखेले याला औपचारिक नोटिस पाठवुन त्याने नेमके काय जप्त केले याबाबत खुलासा मागविला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडुन कोणतीही जप्ती केली नाही व दिशाभुल करण्याकरिता साक्षीदाराने तफावतीचे जबाब दिले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी ही आरोपीची पत्नी असुन तिने यापूर्वी आरोपी विरुध्द भा.द.वि. कलम ३७६ प्रमाणे केस दाखल केल्याचे मला माहिती आहे. मी भा.द.वि. कलम ३७६ प्रमाणेच्या केसचे अवलोकन केले नाही.

४. सायबर क्राईमचा प्रभार माझ्याकडे साधारण सहा महिने होता. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक नेटवर्कला स्वतंत्र आय पी ॲड्रेस असतो. प्रत्येक डिव्हाईसला स्वतंत्र मॅक ॲड्रेस असतो का याविषयी मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मॅक ॲड्रेस बद्दल कुठलाही मजकुर दोषारोपपत्रामध्ये नाही. मी निलकंठ कारखेले याना कुठलाही पत्रव्यवहार करण्याबाबत आदेश दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, सदर गुन्हाचे

कागदपत्राचे मी अवलोकन केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, गुन्हयाचे प्राप्त कागदपत्रावरुन आरोपीने फिर्यादीचे संमतीशिवाय त्यांचे फेसबुक अकांऊट, इस्टाग्राम अकांऊट आणि मेल आय डी हे पासवर्ड बदलले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी याने गुन्हा करतेवेळी वापरलेले मोबाईल व सिमकार्ड हे पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने फेकुन दिला हा सरतपासातील मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की,आरोपीने कुठलाही गुन्हा केला नसताना मी फिर्यादीस मदत करण्याकरिता आज साक्ष देते आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,
समक्ष,

( एल. एस. पाढेण )
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर

दि. २०/०९/२०२५
अहमदनगर